# मेट्रो-3 प्रकल्पाचे ९६ टक्के भुयारीकरण पूर्ण

मुंबई - कुलाबा वांद्रे सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेचे ९६ टक्के भुयारीकरण पूर्ण झाल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडकडून सांगण्यात आले आहे. पॅकेज १ अंतर्गत भुयारीकरणाचा ३८वा टप्पा यशस्वीरीत्या पार पडला असून, कफ परेड ते सीएसएमटी स्थानकापर्यंतच्या ऐतिहासिक वारसा इमारती जवळील भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे. यामुळे पॅकेज १ मधील भुयारीकरण १०० टक्के पूर्ण झाल्याची माहिती देण्यात आली आहे. पॅकेज १ अंतर्गत भुयारीकरणाचा ३८वा टप्पा पार केल्याने हुतात्मा चौक ते सीएसएमटी हा अप लाईन मार्गाचा ५५७ मीटर भुयारीकरणाचा टप्पा एकूण ४०५ रिग्जच्या सहाय्याने १४९ दिवसांत पूर्ण झाला आहे. सूर्या १ या रॉबिन्स बनावटीच्या ड्युएल मोड हार्ड रॉक टनेल बोअरिंग मशीनद्वारे हे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे. मेट्रो-३च्या एकूण ७ पैकी ६ पॅकेजचे १०० टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे. ऐतिहासिक वारसा इमारती नजीक भुयारीकरण करणे हे प्रकल्पातील अनेक आव्हानांपैकी एक होते. अभियंते व कामगार यांसह सर्वांनीच सुरक्षेविषयक दक्षता घेत हे काम कौशल्यपूर्ण पद्धतीने पूर्ण केले याचा आनंद वाटत असल्याचे रणजीत सिंह देओल यांनी स्पष्ट केले आहे.